जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2025
पुण्यनगरी



देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना सुपूर्द करताना मान्यवर.

# विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी लाखाची देणगी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारतीकरिता श्री वसंतराव चौगुले ट्रस्टच्या वतीने एक लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

ट्रस्टचे अध्यक्ष सुभाषआण्णा चौगुले, उपाध्यक्ष अनिल चौगुले, सचिव अनिल पाटील यांच्या हस्ते हा धनादेश कुलगुरूंकडे देण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अध्यासनाच्या सल्लागार समितीचे सदस्य सुरेंद्र जैन, एन. एन. पाटील, डॉ. मनोज पाटील, डी. ए. पाटील, ट्रस्टचे संचालक नितीन चौगुले, लक्ष्मीकांत चौगुले, सुमित चौगुले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
? ? MAR 2025
Times of India

# Hundreds oppose SUK's name-change proposal

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Hundreds of protesters gathered at Shivaji University, Kolhapur (SUK), on Wednesday morning opposing the university's name change proposal raised by Hindu outfits recently.

Social activists, political party workers, university employees, senate members, and followers of Chhatrapati Shivaji Maharaj raised slogans of "Our University, Shivaji University" and demanded that the name of the university should not be expanded from Shivaji University to Chhatrapati Shivaji Maharaj University.

A written statement addressed to Maharashtra Governor C P Radhakrishnan and chief minister Devendra Fadnavis was handed over by the protesters to SUK Vice-Chancellor Dr Digambar Shirke on the occasion.

Shiv Sena (UBT) convenor Vijay Dewane, speaking on the occasion, said, "The first Chief minister of Maharashtra, late Yashwantrao Chavan, established Shivaji University in Kolhapur for the benefit of students from Kolhapur, Sangli, Satara and Solapur. A proposal to name the university as 'Shri Chhatrapati Shivaji Maharaj University' was put forward in the state cabinet then. Yashwantrao Chavan successfully convinced everyone to name it 'Shivaji University' so that the name doesn't get converted into a short form like JNU."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
2 7 MAR 2025

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# यशासाठी चिकाटी, धैर्य आणि आत्मविश्वास आवश्यक : प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील

**कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज):**

विद्यार्थिनींनी यशापर्यंत पोहोचण्यासाठी चिकाटी, सकारात्मक दृष्टिकोन, धैर्य आणि आत्मविश्वास हे गुण अंगी बाणवावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या 'होस्टेल डे' कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी हॉस्टेल डेच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचाही सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनीही मार्गदर्शन केले.

वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अधिक्षक डॉ. कविता



वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. यावेळी विद्यार्थिनींनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. नीलांबरी जगताप यांच्यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2025
लोकमत

# महावीर अध्यासनासाठी वसंतराव चौगुले ट्रस्टकडून एक लाख

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारतीकरिता येथील वसंतराव चौगुले ट्रस्टच्या वतीने एक लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश मंगळवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. ट्रस्टचे अध्यक्ष सुभाषआण्णा चौगुले, उपाध्यक्ष अनिल चौगुले, सचिव अनिल पाटील (संचालक, केडीसीसी बँक) यांच्या हस्ते धनादेश कुलगुरूंकडे दिला.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अध्यासनाच्या सल्लागार समितीचे सदस्य सुरेंद्र जैन, एन. एन. पाटील, संजय शेटे, डॉ. मनोज पाटील, डी. ए. पाटील, ट्रस्टचे संचालक नितीन चौगुले, लक्ष्मीकांत चौगुले, सुमित चौगुले, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2025

तरुण भारत

# पदव्युत्तर परीक्षा अर्ज भरण्यास २८ पर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रात होणाऱ्या पदव्युत्तर परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा अधिविभागामध्ये विनाविलंब शुल्कासह २० ते २८ मार्चपर्यंत अर्ज भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह २९ मार्च ते १ मेपर्यंत तर अतिविलंब शुल्कासह २ ते ३ मेपर्यंत भरावा. महाविद्यालय किंवा अधिविभागांनी विद्यापीठाकडे विनाविलंब शुल्कासह २९ मार्च विलंब शुल्कासह २ मार्च तर अतिविलंब शुल्कासह ४ मेपर्यंत परीक्षा शुल्काची रक्कम जमा करावी. महाविद्यालय किंवा अधिविभागांनी परीक्षा अर्जांच्या याद्या विनाविलंब शुल्कासह २ मेपर्यंत तर ५ मे रोजी विलंब व अतिविलंब शुल्कासह सादर करावयाच्या आहेत. तरी याची दखल अधिविभाग, महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2025
सकाळ

# मुलांमध्ये 'डीकेटीई कॉलेज', तर मुलींत 'डी. वाय. पाटील' विजयी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठ व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेजतर्फे आयोजित 'चेस-मॅन अँन्ड वुमेन' आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत मुलांमध्ये इचलकरंजीच्या डी.के.टी. टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग कॉलेजने, तर मुलींमध्ये कसबा बावडा येथील डी.वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजने विजेतेपद पटकाविले.

गेले दोन दिवस डीआरके कॉलेजच्या एमबीए लीड कॉलेज क्लस्टरच्या वतीने या स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या. स्पर्धेचे उद्‌घाटन प्राचार्या वर्षा मैंदर्गी यांच्या हस्ते झाले. यावेळी एमबीए विभागाचे प्रभारी संचालक डॉ. ताहीर झारी, लीड कॉलेज समन्वयक डॉ. टी. ए. हिलगे, एम.एस. पाटील, शारीरिक शिक्षण संचालक प्रकुल मांगोरे-पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यात विविध महाविद्यालयांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. यात मुलांमध्ये डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजने उपविजेतेपद, तर मुलींत शिवाजी विद्यापीठाच्या डी.ओ.टी. ने उपविजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ राष्ट्रीय बुद्धिबळपटू सारंग पाटील, अमोल आळवेकर यांच्या उपस्थितीत पार पडला.



कोल्हापूर : डीआरके कॉलेजमध्ये आयोजित आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत मुलींमध्ये रंगलेली लढत.

27 MAR 2025
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटी, डी. वाय. पाटील संघांची बाजी

## व्हॉलीबॉल स्पर्धा : विद्यापीठाच्या लीड कॉलेजीसअंतर्गत संयोजन



भडगाव : व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलींच्या गटातील विजेत्या डी. वाय. पाटील कॉलेज संघाला स्वाती कोरी यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. यावेळी डॉ. डी. व्ही. घेवडे व इतर उपस्थित होते.

■ सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. २६ : शिवाजी विद्यापीठअंतर्गत इंजिनिअरिंग लीड कॉलेजीस व्हॉलीबॉल स्पर्धा भडगावच्या डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या आवारात उत्साहात झाल्या. यामध्ये मुलांच्या गटात कोल्हापूरच्या के. आय. टी. कॉलेजने, तर मुलींच्या संघात कोल्हापूरच्याच डी. वाय. पाटील संघाने (साळोखेनगर) विजेतेपद पटकावले.

स्पर्धेत मुले व मुलींचे प्रत्येकी आठ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सल्लागार महेश कोरी यांच्या हस्ते झाले. नरेंद्र नेर्ली प्रमुख उपस्थित होते. प्राचार्य डी. व्ही. घेवडे यांनी स्वागत केले. स्पर्धेचे नियोजन शारीरिक शिक्षण संचालक सागर शिंदे यांनी केले.

मुलांच्या गटात चुरशीच्या लढती झाल्या. अंतिम सामन्यात के. आय. टी. कॉलेजने शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी संघाचा पराभव केला. त्यामुळे या संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. मुलींच्या गटातही रोमांचक सामने झाले. अंतिम फेरीत डी. वाय. पाटील साळोखेनगर संघाने विजेतेपद पटकावले. के. आय. टी.



कॉलेजला उपविजेतेपद मिळाले. पंच म्हणून विनायक नाईक, संपत सांवत, व्ही. बी. खरात, सुरेश पाटील, सुनील रेडेकर, अनिल चौगुले यांनी काम पाहिले. संस्थेच्या सचिव प्रा. स्वाती कोरी यांच्याहस्ते विजेत्या व उपविजेत्या संघाला प्रशस्तीपत्र व चषक देऊन गौरविण्यात आले.